Unit ३ स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह

GoodLuck Page No.
Date

# इतर प्रवाह

## 3] डाव्या चळवळी

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीतील डाव्या चळवळीला महत्वाचे स्थान आहे. इ.स. १९२० च्या दशकाच्या शेवटी व १९३० च्या दशकात भारतात एक प्रभावी डावा गट पुढे आला. त्यामधून राष्ट्रीय चळवळीला जहाल वळण मिळाले. २० व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत राजकीय विचारसरणीच्या संदर्भात डाव्या आणि उजव्या या दोन संज्ञा प्रचलित झाल्या. १९ व्या शतकात समाजवादी व साम्यवादी विचारसरणीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्यांना उजवा गट असे नाव दिले. पुढे औद्योगिक क्रांतीनंतर आणि समाजवादी व साम्यवादी विचाराच्या उदयानंतर ह्या संज्ञांना व्यापक अर्थ प्राप्त झाला. डाव्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या संघटना आल्या.

### डाव्या विचारसरणीच्या उदय होण्याची कारणे

**१) पहिल्या महायुद्धानंतर सामाजिक व आर्थिक स्थिती शोचनीय:-**

पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांनी युद्धकार्यात भारतीयांचे सहकार्य मिळाले विविध प्रकारचे युद्धसाहित्य अमाप पैसा हजारो युद्ध सैनिक भारतातुन पाठविले. भारतीयांचे हजारो सैन्य युद्धामध्ये मृत्युमुखी पडले. भारतीय सैनिकांच्या खर्चाचा बोजा भारतीयांच्या तिजोरीवर लादला गेला. या युद्धखर्चाचा आकडा १२ कोटी ७२ लक्ष पौंडांवर गेला. युद्धकाळात भारतातुन लाकुड, मोटारि व इतर वाहने, तंबु सैनिकांचे कपडे, बंदुका धान्य वस्तु मोठ्या प्रमाणात निर्यात करण्यात आल्या. त्यामुळे देशात भाव कडाडले. धान्याची टंचाई व जाणवू लागली. जनतेचे हाल होऊ लागले. महायुद्धानंतर निर्माण झालेली बेकारी महागाई चलनवाढ व आर्थिक दुरावस्था लोकांना डावी विचारसरणी आवश्यक वाटु लागली.

**२) कार्ल मार्क्सच्या साम्यवादी व क्रांतिकारि विचाराचा प्रभाव.**

१९ व्या शतकातील श्रेष्ठ व क्रांतिकारक विचारवंत म्हणून कार्ल मार्क्सला ओळखला जातो. त्याचा अत्यंत गाजलेले ग्रंथ, दास कॅपिटल समाजजीवनामध्ये परिवर्तन करण्यासाठी प्रभावी ठरला. मार्क्सच्या राजकीय विचाराचा भर मानवजातीच्या मुक्ततेवर होता. त्याने

Scanned by CamScanner

जगाला असे दाखवुन दिले आहे कि दारिद्र्य विषमता या गोष्टी नैसर्गीक व अटळ नसुन त्या मानवनिर्मीत आहेत. त्यामुळे या अडचणी सोडविणे मानवाला शक्य आहे. मार्क्सने दास कॅपिटल या ग्रंथात मांडलेलो अतिरिक्त मुल्याचा सिद्धान्त हा एक महत्वाचा सिध्दांत आहे. भांडवलदाराकडुन श्रमिकांची व मजुरदारांची मोठ्या प्रमाणात पिळवणुक होते. मजुराला त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला न देता जास्त उत्पादन घेतले जाते व अधिक नफा मिळवला जातो याला मार्क्सचा नफ्याचा सिद्धान्त असे म्हणतात. मार्क्स व एंजल्स या दोघांनी साम्यवादाचा जाहिरनामा हा ग्रंथ प्रसिद्ध केला तसेच कामगारांच्या अनेक संघटना स्थापन केल्या. मार्क्सच्या विचाराने जगभरातील लोक प्रभावित झाले. 7 नोव्हेंबर 1917 रोजी व्ही आय लेनिन यांच्या नेतृत्वाखाली रशियन बोल्शेविक क्रांती होऊन झारची हुकुमशाहि राजवट संपुष्टात आली व पहिले समाजवादी सरकार प्रस्थापित झाले. साम्यवादि शासन व्यवस्था प्रस्थापित झाली त्यामुळे भारतातील लोकांच्यावर त्याचा प्रभाव पडल्यामुळे लोक डाव्या चळवळीकडे आकर्षित होऊ लागले.

## 3) महात्मा गांधीजींच्या स्वदेशी व स्वराज्याच्या चळवळीचा परिणाम :-

महात्मा गांधीजींनी असहकार व सविनय कायदेभंगाच्या चळवळीमधुन लोकांच्यात मोठ्या प्रमाणात जागृती केली होती. त्याशिवाय त्यांनी स्वदेशीला महत्व दिले. ब्रिटिशांनी आर्थिक साम्राज्यवादामुळे भारतातील उद्योग नष्ट झाले. लक्षावधी कारागिर बेकार झाले. त्यामुळे गांधीजींनी स्वदेशीचा अवलंब करुन देशी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत हजारो लोक सहभागी झाले. त्यांना अटक झाल्यानंतर हजारो लोक गिरणी व रेल्वे कामगार निदर्शनामध्ये सहभागी झाले. तामिळनाडु व पंजाबमधील व्यापारी दुकानदार विद्यार्थी तसेच गुजरात उत्तर प्रदेश कर्नाटक व बंगालमध्ये आदिवासी मुंबई कलकत्ता मद्रास (चेन्नई) व सोलापूर येथील कामगार या चळवळीला आघाडवर होते. म. गांधीजींच्या चळवळीमध्ये

समाजवाद रुजवण्याची पार्श्वभूमी तयार झाली.

५ सुशिक्षित मध्यम वर्ग समाजवाद व क्रांतिकारी मार्गाकडे आकर्षित.

ब्रिटिशांनी १०० वर्षात आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या भारताला दारिद्र्य बनले फो० फोडा व जोडा या मार्गाचा अवलंबन करून मोठ्या प्रमाणात साम्राज्यविस्तार केला. राज्यसभेच्या माध्यमातून भारतीयांनी ब्रिटिशांकडे विविध प्रकारच्या मागण्या केल्या परंतु ब्रिटिशांनी त्यांच्या मागण्यांचा विचार केला नाही. सुशिक्षित मध्यम वर्गासमोर बेरोजगारी उपासमारी आर्थिक विषमतेची मोठी समस्या होती. ही समस्या सोडविण्यासाठी त्यांना समाजवादी व क्रांतिकारी विचारसरणी जवळची व आधाराची वाटू लागली.

६) पारंपारिक समाजव्यवस्था बदलण्यासाठी डावी विचारधारा तरुण वर्गाला उपयुक्त वाटली.

१९२० नंतर देशाचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. त्यांनी अहिंसा. त्यांनी अहिंसा व शांततेच्या मार्गाने चळवळी सुरू केल्या. परंतु ब्रिटिशांनी आंदोलकांवर लाठीहल्ला तुरुंगात डांबणे विविध प्रकारच्या शिक्षा व दंड करून आंदोलन दडपण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे गांधीजींच्या अहिंसात्मक व शांततेच्या मार्गाने बदल घडवून आणणे अशक्य आहे. गांधीजींचा अहिंसावाद ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध चाललेल्या लोकलढ्याच्या विकासातील अडथळा आहे असे तरुणांना वाटू लागले. जुनी पारंपारिक समाजव्यवस्था तात्काळ बदलण्यास साम्यवादासारखी जवी आक्रमक विचारधारणा उपयुक्त ठरेल असे हिंदी तरुण वर्गाला म्ह० वाटले.

वरील कारणांमुळे भारतात साम्यवादी विचारांचा प्रसार होऊ लागला. व त्यामधून डावी चळवळ उभी राहण्यास मदत झाली.

## डाव्या पक्षांचा उदय व चळवळी

भारतात डाव्या पक्षांच्या उदयामुळे प्रामुख्याने 1) साम्यवादी (कम्युनिस्ट) समाजवादी असे दोन गट किंवा पध्दत उदयाला आली व विकसित झाली.

### 1) साम्यवादी गट :-

सन 1917 च्या रशियातील बोल्शेव्हिक क्रांतीनंतर भारतात मार्क्सवादाचा प्रचार होऊ लागला. कामगार वर्गात असणाऱ्या असंतोषामुळे साम्यवादी विचारास खतपाणी मिळाले. आर्थिक विषमतेवर मात करणे कामगारांची ससेहोलपट थांबवणे या उद्देशाने भारतात साम्यवादी विचारांचा संघटना स्थापन होऊ लागल्या. मुंबई कलकत्ता कानपूर लाहोर मद्रास इ. उद्योगप्रधान नगरांमध्ये साम्यवादी संघटना स्थापन झाल्या. बंगालमध्ये नवयुगाचे संपादक मुजफ्फर अहमद मुंबईच्या सोशलिस्टचे संपादक श्रीपाद अमृत डांगे. लाहोरमधील इन्कलाब चे संपादक गुलामहुसेन आणि मद्रासमध्ये सिंगरवेलू चेट्टियार ह्यांनी कामगार व शेतकऱ्यांना पाठिंबा देऊन साम्यवादी विचारांच्या प्रसाराचे कार्य केले. भारतात डावी चळवळ दोन प्रकारे विकसीत झाली.

1) आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीची शाखा म्हणून

2) कॉंग्रेसची डावी आघाडी म्हणून असलेला कॉंग्रेस समाजवादी

19 व्या शतकात युरोपात समाजवादी व साम्यवादी विचारधारा फोफावली आर्थिक प्रश्नावर तोडगा सुचविणारी आर्थिक नीती 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात उदयास आली. देशात समाजवादी व साम्यवादी गटांची स्थापना झाली. देशाच्या स्वातंत्र्य-चळवळीत अग्रभागी असलेल्या कॉंग्रेस पक्षाच्या तरुणांवर रशियातील समाजवादी क्रांतीचा जबरदस्त प्रभाव होता. जवाहरलाल नेहरु सुभाषचंद्र बोस यांच्यासारखी तरुण कॉंग्रेस नेत्यांचा एक डावा गट तयार झाला. देशातील आर्थिक राजकीय व सामाजिक संकटे दूर करण्यासाठी म. गांधीजींनी राजकीय कार्यक्रम असणे अशक्य आहे. सनदशीर सत्याग्रही अहिंसक मार्गाने स्वतंत्र मिळणे अशक्य आहे. असे त्यांना वाटत होते. त्यामुळे हे नेते

देशातील तरुण विद्यार्थी वर्गाचे स्फुर्तिस्थान व आदर्श नेते होते

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष (साम्यवादी पक्ष)

डाव्या चळवळीमधील हा अत्यंत महत्वाचा पक्ष होय सोव्हिएत युनियनमधील क्रांतीमुळे परदेशातील व भारतातील क्रांतीकारक प्रभावीत झाले. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नेतृत्वाखाली ताश्कंदमध्ये असलेल्या अवनी मुखर्जी व भारतीयांनी ऑक्टोबर 1920 मध्ये ताश्कंद रॉ येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली यानंतर भारतात अनेक डावे गट व संघटना स्थापन झाल्या त्या डिसेंबर 1925 मध्ये त्यापैकी सत्यभक्त यांनी व इतर गटाने कानपुर येथे भारतीय कम्युनिस्ट पक्ष (Communist Party of India and (P.I) या नावाने एक अखिल भारतीय संघटना स्थापन केली. पक्षाच्या सदस्यांनी कॉंग्रेसचे सभासदत्व स्वीकारले आणि कॉंग्रेसमध्ये प्रबळ डावा गट उभारून कॉंग्रेसला सर्वसामान्यांची व जहाल संघटना बनविण्याचे प्रयत्न करावे असा आदेश भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या सभासदांना देण्यात आला.

साम्यवादी चळवळीने किंवा कम्युनिस्ट पार्टीने पुढीलप्रमाणे कार्य केले. साम्यवादी चळवळीचे पाच टप्पे पडतात

### अ] पहिला टप्पा :-

मास्कोमध्ये साम्यवादाचे शिक्षण घेऊन साम्यवादी क्रांतीकारकांचा पहिला गट भारतात आला भारतीय साम्यवादी पक्षाला नवे विचार प्रेरणा देण्याचे काम चालु आहे. साम्यवादी संघटना तयार होऊ लागल्या. बंगाल, मुंबई, पंजाब व उत्तर प्रदेशात कामगार व शेतकऱ्यांच्या संघटना स्थापन केल्या पेशावर कट खटला (1922-23) कानपुर कट खटला (1924) आणि मीरत खटला (1928-33) या तीन कटाशी साम्यवादी संबंधीत कट होते. त्यांच्या या क्रांतीकार्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले कम्युनिस्ट पक्षातील सक्रिय नेते श्रीपाद डांगे मुझफ्फर अहमद शौकात उस्मानी नीलनी गुप्ता डांगे मुझफ्फर अहमद यांनी कानपुर कटाचे केल्याच्या आरोपावरुन तुरुंगवास पत्करावा लागला मीरत

चालला तर साडेतीन वर्षे चालला. त्यात 27 लोकांना शिक्षा झाली. यामधील अर्धे लोक ट्रेड युनियनचे (व्यावसायिक संघ) होते. यामध्ये काही साम्यवादी शहीद झाले. साम्यवाद्यांच्या इंग्रजांविरोधी धोरणामुळे राष्ट्रवाद्यांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली.

## ब) दुसरा टप्पा:

या काळात राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींच्याकडे होते. या काळात साम्यवाद्यांनी गांधीजींच्या नेतृत्वावर टीका केली व भारतीय कामगारांचे शोषण करणाऱ्या उद्योगपतींचे काँग्रेस समर्थन करीत आहे तसेच काँग्रेसमधील डाव्या गटाला काँग्रेस विरोध करून राष्ट्रीय चळवळीच्या प्रगतीत अडथळा आणत आहे असा आरोप केला परंतु यामुळे साम्यवादी पक्ष मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून बाजूला पडला.

## क) तिसरा चौथा व पाचवा टप्पा:-

काँग्रेसमधील डावा गट मजबूत करणे व उजव्यांना बाहेर काढणे. हा हेतू साम्यवाद्यांना सफल झाला नाही. चौथ्या अवस्थेत भारतीय साम्यवाद्यांनी दुसऱ्या महायुद्धात इंग्रज-रशियन युद्धप्रयत्नांना सहकार्य देणे सुरू केले. ज्या इंग्लंडला साम्राज्यवादी म्हणत होते त्यांनाच मदत केली. 1942 च्या चळवळीमधील साम्यवाद्यांनी इंग्रजांकरिता गुप्तहेराचे कार्य करून चळवळ पोखरली त्यामुळे त्यांच्यावर मोठी टिका झाली. पाचव्या टप्प्यात सुरवातीला साम्यवाद्यांनी मुस्लीमांचे समर्थन केले. अलगपणाच्या भावनांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले. भारत छोट्या, छोट्या स्वतंत्र राज्यात विभाजीत व्हावा म्हणजे आपल्या विचारसरणीचा प्रसार करता येईल असे त्यांना वाटत होते. सोव्हिएट संघाप्रमाणे भारताला 17 स्वातंत्र्य, सार्वभौम होते. सोव्हिएट राज्यात विभाजित केले जाते या त्यांच्या धोरणामुळे साम्यवाद्यांबद्दल कोणालाही सहानुभूती उरली नव्हती.

कम्युनिस्ट विचारसरणी व प्रचारकार्य यामुळे देशभर कामगार व शेतकरी यांच्या संघटना स्थापन झाल्या स्वातंत्र्य

चळवळीला गती देण्याचे कार्य त्या विचारसरणीमधुन झाले.

## शेतकरी कामगार व तरुणांच्या डाव्या संघटना व त्यांच्या चळवळीला :-

कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेनंतर भारतात साम्यवादी विचारसरणी मोठ्या प्रमाणात रुजू लागली. डाव्या विचारसरणीवर आधारित शेतकरी कामगार व इतरांच्या संघटना स्थापन होऊ लागल्या त्यांनी शेतकरी, कामगार व इतरांचे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळी केल्या देशभरात २०० हुन अधिक संप घडवून आणले त्या संघटना पुढील प्रमाणे.

### 1) ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस (AITU (आयटक)

ही कामगारांची अखिल भारतीय संघटना असुन कम्युनिस्ट व कॉंग्रेस नेत्यांनी ही संघटना स्थापन केली या संघटनेत कम्युनिस्ट नेत्यांचा मोठा प्रभाव होता. या संघटनेची स्थापना मुंबई येथे १९२० साली झाली. व तिचे पहिले अधिवेशन मुंबईत लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली झाले. कलकत्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस व भुलाभाई देसाई यांनी विशेष कार्य केले. त्यांनी १९२८ मध्ये जमशेदपुरच्या संपात भाग घेतला १९३० मध्ये रेल्वे कामगारांचा संप घडवून आणला कलकत्त्यामध्ये गाडीवानांचा संप घडवून आणला या संपात कामगार व पोलिस चकमकी होऊन हिंसाचार घडवून आणला.

### २) स्टुडंटस् लीग :-

कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव विद्यार्थी व तरुण वर्गावरही मोठ्या प्रमाणात असलेला दिसत होता. जवाहरलाल नेहरु व सुभाषचंद्र बोस डाव्या विचारसरणीमुळे आकर्षित झाले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली देशात अनेक विद्यार्थ्यांच्या संघटना स्थापना झाल्या

Scanned by CamScanner

3) ऑल बेंगाल स्टुडंटस कॉन्फरन्स :-

कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली भारतात विद्यार्थ्यांच्या संघटना कार्यरत होत्या. संघटनांच्या परिषदा देशभरात होतल्या जात होत्या 1928 साली ऑल बेंगाल स्टुडंटस कॉन्फरन्सचे अधिवेशन जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते.

2 काँग्रेस समाजवादी गट :-

हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीची मागणी तीव्रपणे करणारा व मागणीला गती देणारा हा काँग्रेसमधील तरुणांचा पक्ष होता. देशातील गांधीप्रणीत नेतृत्व व गांधीप्रणीत विचारप्रणाली यामुळे काँग्रेस तरुण वर्गाला भ्रमनिरास झाला. यामुळे ते समाजवादी विचारसरणीकडे आकर्षित झाले युवकांच्या संघटनामध्ये काम करतांना अनेकांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगवासात त्यांनी मार्क्सवाद व इतर समाजवादी कल्पनांचा अभ्यास केला त्यावर चर्चा केली गांधीजींनी असहकाराची चळवळ अचानकपणे थांबविले 1931 व 1933 मध्ये सविनय कायदेभंग चळवळ स्थगीत केली. 1940 मध्ये वैयक्तिक सत्याग्रह केला यावर कांच्यांनी कडाडुन टीका केली व समाजवादाकडे वळले

जुलै 1931 मध्ये जयप्रकाश नारायण फुलनप्रसाद वर्मा यांनी इतरांच्या मदतीने बिहार सामजवादी पक्षाची स्थापना केली. 1933 मध्ये पंजाब समाजवादी पक्ष स्थापना केली

काँग्रेस समाजवादी पक्षाने काँग्रेसमध्येच राहुन काँग्रेस ला मजबुत करण्यासाठी व त्यांच्या धोरणाला वळण देण्यासाठी प्रयत्न केले. कामगार व शेतकऱ्यांच्या वर्गीय संघटना उभ्या करणे त्यांच्या आर्थिक मागण्यांसाठी लढा देणे हे धोरण स्वीकारुन राष्ट्रीय चळवळीला गतिमान करण्यासाठी धडपड केली. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान या पक्षाने ब्रिटिशांची कोंडी करण्याच्या उद्देशाने स्वतंत्र्य चळवळीला तीव्र करावी अशी मागणी केली. 1942 ची चले जाव चळवळीत काँग्रेसमधील या डाव्या गटाने सक्रिय भाग घेतला होता नंतरच्या काळात ब्रिटिशांनी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्यासंबंधी ज्या योजना सुचवल्या होत्या त्या स्वीकारु नयेत व हिंदुस्थानाची फाळणी करु नये असे या गटाचे म्हणणे होते

Scanned by CamScanner

1935 चा कायदा हा साम्राज्यवादी शक्तींच्या व जनतेच्या विरोधी असल्याने समाजवादी पक्षाने या कायद्याला निषेध केला होता. 1937 मध्ये काँग्रेसने मंत्रिमंडळ बनविण्यासाठीही या कायद्याने विरोध केला होता. काँग्रेसने 1936 च्या निवडणूक घोषणेत जनतेच्या सामाजिक व आर्थिक अडचणी दूर करण्याचा केलेला निश्चय हा समाजवाद्यांच्या कार्याचा व दबावाचा परिणाम होता. त्याशिवाय साम्राज्यवादी सरंजामशाही व जातीयवादी प्रवृत्तींना नष्ट करण्यासाठी क्रांतीकारी स्वरूपाचा संघर्ष केला पाहिजे असे त्यांना वाटत होते.

## इतर डाव्या चळवळी

काँग्रेस समाजवादी पक्षाने डावी विचारसरणी जोपासली वाढविण्यासाठी प्रयत्न केले. डाव्या कम्युनिस्टांनी देशात चळवळी उभ्या केल्या होत्या. त्याशिवाय डाव्या विचारसरणीचे काम धरून काही नेत्यांनी 1930 ते 1940 च्या दरम्यान डाव्या चळवळींची उभ्या केल्या त्यातील काही संघटना व चळवळी पुढीलप्रमाणे.

### 1) रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी :-

मानवेंद्रनाथ राय यांनी हिंदी कम्युनिस्टांशी मतभेद झाल्यानंतर 1940 साली हा पक्ष स्थापन केला. या पक्षाने डाव्या विचारसरणीचा प्रचार केला. कामगार व शेतकऱ्यांना क्रांतीकार्यात सहभागी करून घ्यावे असे पक्षाचे उद्दिष्ट्ये होते.

### 2) फॉरवर्ड ब्लॉक :-

काँग्रेसमधील तरुण कार्यकर्त्यांचा एक गट जहाल पुरोगामी विचारांनी भारावलेला होता. या गटाचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस व जवाहरलाल नेहरू यांच्याकडे होते. ब्रिटिशांनी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य द्यावे असा निर्वाणीचा इशारा काँग्रेसने स्वीकारला नाही. नेताजींच्या बरोबर गांधीजींचे तीव्र मतभेद झाले. पुढे त्यांनी मार्च 1939 मध्ये फॉरवर्ड ब्लॉक हा क्रांतिकारी डावा पक्ष स्थापन केला. ब्रिटिशांना सहकार्य न करता स्वातंत्र्य चळवळ सशस्त्र सामर्थ्याने लढविणे असे पक्षाचे धोरण होते.

Date

3 क्रांतिकारी समाजवादी पक्ष :-

1940 मध्ये बंगालमध्ये हा पक्ष स्थापन झाला क्रांती च्या नावातून त्या पक्षाचे धोरण समजते ब्रिटिशांनी पाठिंबा न देणे त्यांच्याशी संघर्ष करणे इंग्रजांना देशाबाहेर काढणे त्यासाठी हिंसेचा अवलंब करणे हे या पक्षाचे उद्दिष्ट्ये होते.

4) भारतीय बोल्कोविक पक्ष,

1939 मध्ये एन दत्त मुजुमदार यांनी पक्षाची स्थापना केली. ब्रिटिशांना विरोध स्वातंत्र्याच्या चळवळीला या पक्षाने गती दिली.

5) बोल्शेविक लेनिनिस्ट पार्टी :-

1941 मध्ये अजित रॉय व इंद्रसेन यासारख्या ट्रॉट्स्कीच्या क्रांतिकारी अनुयायांनी हा पक्ष स्थापना केला.

6) रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया :-

1942 मध्ये सौम्येंद्रनाथ टागोरांनी या पक्षाची स्थापना केली संघर्ष करणे क्रांती घडवून आणणे व डाव्या विचारसरणीचा प्रसार करणे हे या पक्षाचे उद्देश होते.

7) जहाल लोकशाही पक्ष,

भारतातील साम्यवादी चळवळीचे भरीव व प्रभावीपणे कार्य दिसून येत नव्हते. काही वेळा त्यांच्यावर टिका होऊ लागली. त्यामुळे साम्यवादी चळवळीचे प्रवर्तक मानवेंद्रनाथ रॉय मार्क्सवादाने निराश झाले त्याने 1940 मध्ये जहाल लोकशाही पक्ष स्थापन केला सर्व वर्गाच्या संघटना शक्तीद्वारे भारतात क्रांती घडविणे हे या पक्षाचे उद्दिष्टे होते.

● डाव्या चळवळीचा प्रभाव किंवा मुल्यमापन :-

हिंदुस्थानाच्या चळवळीत डाव्या चळवळीचे महत्वपूर्ण स्थान आहे. रचनात्मक कार्यावर भर देऊन कामगारांची संघटन करणे श्रमिकांना नागरिकत्वाचे धडे देणे मागासवर्गीयांमध्ये सांस्कृतिक

Scanned by CamScanner

वातावरण निर्माण करणे जातीयता अंधश्रद्धा आणि धर्मवेड यांच्याशी मुकाबला करून समाजवादी समाज घडविणे अंध्येय हे या पक्षाची उद्दिष्ट्ये होती. शेतकरी कामगार व सामान्य जनतेसाठी लढा उभारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या चळवळीने केले आहे. त्याचबरोबर हिंदुस्थानातील सामान्य जनतेस राष्ट्रीय प्रवाहात आणून सोडण्याचे कार्य या चळवळीने केले आहे.

अशा या डाव्या चळवळीचा प्रभाव किंवा मूल्यमापन पुढीलप्रमाणे.

1) कामगार व शेतकऱ्यांच्या संघटना बांधल्या गेल्या. त्यांच्यातील संघटन हे महत्त्वाचे कार्य होते.

2) भारताने समाजवादी चित्र रेखाटणे समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा समाजवादी कार्यक्रम राबविण्यासाठी प्रयत्न केले.

3) फॅसिस्ट शक्तींना वसाहतवादाला व युद्धाला विरोध करणारे परराष्ट्रीय धोरण आखण्यात यावे यासाठी सरकारवर दबाव

4) राष्ट्रीय कॉंग्रेसवर डाव्या चळवळीचा इतका प्रभाव होता कि अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीतील (AICC) डाव्या विचारसरणीकडे झुकलेल्या सभासदांची संख्या ⅓ होती व त्यांनी कॉंग्रेसच्या निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची जबाबदारी असलेली.

5) 1936 ते 1939 चा काळात डाव्या विचारसरणीचा प्रभाव असलेले पं. जवाहरलाल नेहरू सुभाषचंद्र बोस हे नेते कॉंग्रेसचे अध्यक्ष बनले. आचार्य नरेंद्र देव जयप्रकाश नारायण अच्युत पटवर्धन हे तिन प्रखर डाव्या विचारसरणीचे प्रतिनिधीत्व करणारे नेते कॉंग्रेसच्या कार्यकारि समितीत नियुक्त.

6) 1939 मध्ये डाव्या गटाच्या सुभाषचंद्र बोस यांनी पट्टाभिसीतारम्या यांचा पराभव करून कॉंग्रेसच्या अध्यक्ष पदाची निवडणूक 1.580 विरुद्ध 1.377 अशा मतांनी जिंकली होती. पट्टाभिसीतारामय्या हे गांधीजींचे उमेदवार म्हणून ओळखले जात होते.

7) राष्ट्रीय चळवळीत डाव्या गटाचा प्रभाव होता. त्याचे प्रतिबिंब 1937 च्या फैजपूर अधिवेशनात आर्थिक धोरण व ठराव मंजूर झाले. त्याशिवाय म. गांधीजींनी आर्थिक व वर्गीय प्रश्नाबाबत जहाल भूमिका घेतली.

8) डाव्यांच्या प्रभावामुळे अखिल भारतीय संस्थानिक प्रजा परिषद व संघटनांची स्थापना केली.

Scanned by CamScanner

डाव्यांचा सर्वात मोठा प्रभाव म्हणजे भारतात भारतीय कम्युनिस्ट पक्ष व कॉंग्रेस समाजवादी पक्ष हे दोन डावे पक्ष स्थापन झाले व त्यांची वाढ होत गेली.

10) राजकीय विचारप्रणालीच्या दृष्टीने समग्र कॉंग्रेसला एक शौकत-शाली डावे वळण मिळाले.

## 6] नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना :-

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळातील एक वादळी व महान व्यक्तिमत्त्व म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे पाहिले जाते. नेताजी व आझाद हिंद सेना यांच्या कर्तबगारीने भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. राष्ट्राभिमानी लढाऊ राष्ट्रवादाचा आग्रहाने पुरस्कार करणारे जाज्वल्य व जहाल विचारसरणी व राजकारणासाठी अग्रणी असलेल्या नेताजींनी भारताला ब्रिटिश साम्राज्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी आपल्या मायभूमीसाठी आपले अमूल्य प्राणपणाला लावले आझाद हिंद सेनेच्या सहकार्याने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध त्यांनी उभारलेला सशस्त्र लढा हा स्वातंत्र्याच्या चळवळीला एक नवी झळाळी देऊन गेला. भारतीय जनता त्यांना आदराने नेताजी असे म्हणत.

## जन्म बालपण व शिक्षण :-

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म जानकीनाथ आणि प्रभावती-देवी या दांपत्याच्या पोटी 23 जानेवारी 1897 रोजी मध्यमवर्गीय बंगाली कुटुंबात ओरिसातील कटक शहरात झाला. शालेय शिक्षण येथे झाले. त्यामुळे शालेय जीवनात अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून त्यांना ओळखले जात होते. महाविद्यालयीन शिक्षण कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. महाविद्यालया-त सुभाषचंद्र बोस इतरांपेक्षा उठून दिसत नि अभ्यासेत्तर क्षेत्रात मोठ्या उत्साहाने भाग घेत. महाविद्यालयात त्यांनी वादविवाद (डिबेटिंग क्लब) सभा काढली स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीने अरविंद घोष यांच्या विचारसरणीने चांगलेच प्रभावित अनाथ भांडारामध्ये त्यांनी काम केले. 1915 मध्ये ते इंटरमिजिए-टच्या परीक्षेत पहिल्या विभागात आले कटकामध्ये असताना

रेवेन्शॉ कॉलीजिएट हायस्कुल नामक शाळेत शिक्षण घेत असताना वेणी माधवदास या शिक्षिकेने नेताजींच्या देशभक्तीचे स्फुल्लिंग जागवले होते. वेदामधील आदर्शवादाकडे ते आकर्षित झाले होते. त्याचा परिणाम म्हणून वयाच्या सतराव्या वर्षी ते घर सोडुन ईश्वराच्या अनुभुतीच्या शोधात हिमालयात गेले परंतु त्यांना मनासारखा गुरु मिळाला नाही. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचुन नेताजी त्यांचे शिष्य बनले.

प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना अन्यायाविरुध्द लढण्याची त्यांची प्रवृत्ती दिसुन येत असे. या महाविद्यालयात सी. एफ. सी. ओटेन (F.C. otents) नावाचे प्राध्यापक होते जे हिंदी विद्यार्थ्यांशी राज्यकर्त्या इंग्रजांच्या गुर्मीत असत त्यांच्याकडे वांशिक उद्दामपणा होता. त्याला धडा शिकवण्याचे सुभाषचंद्रांनी ठरवले. त्यांनी इतर विद्यार्थ्यांनी त्या प्राध्यापकावर हल्ला चढविला व त्याला धक्काबुक्की केली. त्यामुळे सुभाषचंद्रांना व इतर काही विद्यार्थ्यांना कॉलेजमधुन काढुन टाकले पुढे प्रवेश मिळाल्यानंतर ते तत्वज्ञान हा विषय घेऊन पदवी परीक्षा दुसऱ्या क्रमांकानी उत्तीर्ण झाले. उच्च अभ्यासक्रमासाठी लंडनला जायाचे त्यांनी निश्चित केले आय. सी. एस परीक्षा देण्यासाठी ते केंब्रिज विद्यापिठात आले. आपल्या मित्रांबरोबर बोलताना नेताजी म्हणाले मला सरकारी नोकरी करण्याची इच्छा नाही. मी आय. सी. एस. च्या परिक्षेत उत्तीर्ण झालो तरी लागलीच त्या नोकरीचे त्यागपत्र देण्याचे ठरविले आहे. त्यांच्या ठिकाणी असलेला राष्ट्राभिमान व देशप्रेम यातुन स्पष्ट होते. जुलै 1920 मध्ये आय. सी. एस परिक्षा चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

## स्वातंत्र्यलढ्यात प्रवेश :-

सुभाषचंद्र हे देशप्रमाणे भरावुन गेले होते. त्यामुळेच त्यांनी आय. सी. एस च्या नोकरीचे त्यागपत्र २ एप्रिल 1921 ला दिले. व ते हिंदुस्थानात येण्यासाठी निघाले ते गांधीजींना भेटले परकीय नोकरशाहिकडुन सत्ता हस्तगत करण्यात शेवट होणाऱ्या गांधीजींच्या चळवळीच्या आवश्या यामुळे सुभाषचंद्राचे समाधान झाले नाही. त्यानंतर ते चित्तरंजन दास यांना भेटले 1921 मध्ये

नॅशनल कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून सुभाषचंद्रांनी काम केले त्याच वर्षी ते आंदोलनात सक्रिय सहभागी झाले. 17 नोव्हेंबर 1921 मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स च्या आगमनप्रसंगी काँग्रेसने कलकत्यात बरताळ पाळला त्यात सुभाषचंद्रांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस स्वयंसेवकांनी चांगले काम केले. सरकारविरोधात मोठी चळवळ सुरु झाली शेवटी चित्तरंजन दास व सुभाषचंद्र बोस यांना अटक झाली. (10 डिसेंबर 1921) सुभाषचंद्र व इतरांना 8 फेब्रुवारी 1922 ला सहा महिन्याच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

## विविध पदांवर व स्वातंत्र्यलढ्यातील कार्य :-

तुरुंगातून सुटून झाल्यानंतर 1923 मध्ये सुभाषचंद्रांनी ऑल बंगाल युथ लीगची स्थापना केली व युवकांना त्यामध्ये संघटीत केले. थोड्याच दिवसात ते स्वराज्य पक्षाचे मुखपत्र फॉरवर्ड च्या दैनिकाचे संचालक व बंगाल काँग्रेसचे सचिव बनले. 1924 मध्ये चित्तरंजन दास कलकत्याचे महापौर म्हणून निवडून गेले. तेव्हा सुभाषचंद्रांना त्यांनी आपले प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केले होते. सुभाषबाबुंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेचा काम करण्याची पध्दत बदलून टाकली. कलकत्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून त्यांनी भारतीय नावे दिली गेली स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतीकारकांच्या कुटुंबियात महापालिकेत नोकरी मिळू लागली. लवकरच सुभाषबाबुंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली क्रांतीकारकांशी प्रेमाने आहेत. या संशयाने 25 ऑक्टोबर 1924 ला प्रात:काळी सुभाषचंद्रांना सरकारला अटक केली होती व हद्दपार करून मंडालेच्या तुरुंगात डांबले तुरुंगात असताना ते बंगाल प्रांतिक कायदेमंडळावर निवडून आले. अडीच वर्षांच्या तुरुंगवासानंतर 16 मे 1927 मध्ये प्रकृतीच्या कारणास्तव त्यांची तुरुंगातून सुटका झाली.

1928 साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले. तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले कलकत्यात सुभाषबाबुंनी आंदोलनाचे नेतृत्व केले बहिष्काराची चळवळ पेटवली सुभाषचंद्र सार्वजनिक चळवळीसाठी उत्सुक होते. कमिशनला उत्तर देण्यासाठी

काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती केली पंडित मोतीलाल नेहरू या समितीचे अध्यक्ष होते. तर सुभाषचंद्र एक सदस्य होते. या समितीने नेहरू रिपोर्ट सादर केला याच वर्षी काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यात झाले या अधिवेशनात सुव्यवस्था व शिस्त राखण्याकरिता तयार करण्यात आलेल्या स्वयंसेवक दलाचे ते प्रमुख होते. या अधिवेशनात त्यांनी खाकी गणवेश घालून पंडित मोतीलाल नेहरूंना लष्करी पद्धतीने सलामी दिली तसेच याच अधिवेशनात गांधीजींनी मांडलेल्या डोमिनियमस्टेटसच्या ठरावाला सुभाषचंद्रांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारी दुरुस्ती सुचवीली. त्यांनी महात्मा गांधी व अरविंद घोष यांच्या तत्वज्ञानावर उघडपणे हल्ला चढवीला भारताने आधुनिकतेकडे वाटचाल केली पाहिजे. अहिंसेऐवजी अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनीच शत्रुंशी लढा दिला पाहिजे असे आग्रहाने मांडले. त्यांच्या लढाऊ तत्वज्ञानाला कोणातेही तडजोड मान्य नव्हती. 1930 साली कलकत्त्याचे महापौर म्हणून त्यांची निवड झाली. त्याच काळात सुरु झालेल्या कायदेभंगाच्या चळवळीही त्यांनी पुढाकार घेतला. त्यात त्यांना पुन्हा तुरुंगवास सोसावा लागला.

भारताच्या स्वातंत्र्याकरिता परदेशाकडून मदत मिळाली तरी ती घ्यावी काँग्रेसने पूर्ण पुनर्रचना करावे व नेतृत्वात बदल करावा सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेणे ही राष्ट्राच्या दृष्टीने फार मोठी आपत्ती ठरली आहे. भारतीयांनी अनेक वर्षे सोसलेल्या हालअपेष्टांना त्यामुळे पाणी फिरले आहे. भारताच्या उद्दिष्ट्यांची पूर्ती गांधीजींच्या नेतृत्वाखाली होणे शक्य नाही असे त्यांचे मत होते. 1933 मध्ये लंडनहुन प्रकाशित केलेल्या The India strug हा 1919 या आपल्या पुस्तकात ब्रिटिश अधिसत्तेविरुद्धच्या लढ्यात गांधीजींना घालून दिलेल्या अहिंसक अधिकाराऐवजी अधिक परिणामकारी मार्ग आवश्यक आहे. असे सुभाषचंद्रांनी स्पष्ट केले असेल तरी गांधीजींच्याबद्दल त्यांना नितांत आदर होता. जुलै 1944 मध्ये रंगुन रेडिओवरून बोलताना राष्ट्रपिता म्हणून त्यांनी गांधीजींचा गौरवाने उल्लेख

Scanned by CamScanner

केला व मायभूमीच्या स्वातंत्र्याकरिता त्यांनी सुरु केलेल्या लढ्याला गांधीजींचे आशीर्वाद मिळावेत अशी इच्छा व्यक्त केली.

## हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष व फॉरवर्ड ब्लॉक ची स्थापना :

1938 मध्ये काँग्रेसचे एक प्रभावी नेते म्हणून सुभाषचंद्र बोस ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध संघर्ष करण्याच्या तयारीत होते. काँग्रेसमधील जहाल गटाचे नेतृत्व नेताजी व जवाहरलाल नेहरु यांच्याकडे होते. 1938 सालच्या हरिपुरा येथील काँग्रेस ची निवड झाली. अधिवेशनात सुभाषचंद्रांनी एकमताने अध्यक्षपद ची निवड झाली. अधिवेशनात त्यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत प्रभावी झाले. या काळात त्यांनी ~~अध्यक्षीय~~ योजना आयोग-स्थापना केली पंडित जवाहरलाल नेहरु यांचे अध्यक्ष होते. बंगालोर येथे प्रसिद्ध वैज्ञानिक सर विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक विज्ञान परिषद भरावेली 1937 मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले. तेव्हा सुभाषबाबुंनी काँग्रेसने तिनी जनतेला साह्य करण्यासाठी डॉ द्वारकानाथ कोटणीस त्यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकिय पथक पाठवण्याचा निर्णय घेतला.

1938 साली सुभाषबाबु काँग्रेसचे अध्यक्ष असेल तरी गांधीजीना त्यांनी कार्यपद्धती पसंत नव्हती याच सुमारास युरोपात दुसऱ्या महायुद्धाची छाया पसरली होती. या वेळी सुभाषबाबुची इच्छा होती की इंग्लंडच्या कठीण परिस्थितीचा फायदा उठवून भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र केला जावा. अध्यक्ष-पदाच्या कारकिर्दीत त्यांनी या दिशेने पावले टाकण्यास सुरवात केली परंतु गांधीजींचा त्याला विरोध होता. 1939 मध्ये काँग्रेस अध्यक्ष निवडण्याची वेळ आली. त्या वेळी सुभाषबाबुंना कोणत्याहि दबावाला न झुकणारा अध्यक्ष पाहिजे होते. त्यासाठी दुसरी व्यक्ति त्यांच्यासमोर न आल्यामुळे सुभाषबाबु स्वतः पुन्हा काँग्रेसचे अध्यक्ष बनु इच्छित होते. गांधीजींनी त्यांना विरोध केला. व अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून पट्टाभिसीतारामैय्या यांची निवड केली कविवर्य रविंद्रनाथ ठाकुर के यांनी सुभाषबा-बुंनी अध्यक्ष करण्यासाठी गांधीजींना पत्र पाठवले प्रफुल्लचंद्र रॉय मेघनाद सहा वैज्ञानिकांनी नेताजींनी अध्यक्ष व्हावे. असेच

इच्छा होती. नेताजींच्या उमेदवारीला राजेंद्रप्रसाद पटेल कृपलानी इ. जेष्ठ पुढाऱ्यांनी कसून विरोध केला. शेवटपर्यंत तडजोड न झाल्याने अनेक वर्षानंतर अध्यक्षपदाची निवडणूक झाली. गांधीजींचे उमेदवार पट्टाभिसीतारामय्या उभे होते. परंतु त्यांचा पराभव झाला. सुभाषबाबुंना निवडणुकीत 1580 मते मिळालीतर पट्टाभिसीतारामैय्या 1377 मते मिळाली. गांधीजींनी विरोध करूनही सुभाषबाबुंनी 203 मतांनी निवडणूक जिंकली सुभाषचंद्र कॉंग्रेसचे अध्यक्ष बनताच पटेल प्रसाद इत्यादि गांधी अनुयायांनी कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

विरोधाच्या वातावरणातच सुभाषबाबूंनी अध्यक्षतेखाली त्रिपुरा येथे मार्च 1939 मध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन भरले. गांधीजींच्या साथीदारांनी सुभाषबाबुंना सहकार्य केले नाही. सहा महिन्याच्या आत ब्रिटिशांना भारताला पूर्ण स्वातंत्र्य द्यावे अन्यथा कॉंग्रेस राष्ट्रीय आंदोलन करेल असा निर्वाणीचा इशारा कॉंग्रेसने ब्रिटिशांना द्यावा असे आवाहन सुभाषबाबूंनी केले. परंतु सुभाषबाबुंचे समर्थक व गांधीजींचा गट अशी कॉंग्रेस दुभंगली होती. कॉंग्रेसमध्ये गांधी गटाचे प्राबल्य होते. सुभाषबाबुंच्या मताचे कोणी समर्थन करणारा नाही हे उघड होते. गांधीजींच्या साथीदारांनी सहकार्य काही चालू दिले नाही. शेवट परिस्थिती अशी बनली की सुभाषबाबु काही काम करू शकत नव्हते. त्यामुळे त्यांनी कॉंग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मे 1939 मध्ये फॉरवर्ड ब्लॉक नावाचा नवा राजकीय पक्ष स्थापन केला. जमीनदार भांडवलदार, सावकार यांच्याविरुद्ध लढा देऊन शेतकरी व कामगार वर्गाच्या कल्याणाकरिता कार्य करणे हे फॉरवर्ड ब्लॉकचे प्रमुख उद्दिष्टचे असल्याचे घोषित करण्यात आले. दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी फॉरवर्ड ब्लॉकने भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र करण्यासाठी जनजागृती सुरू केली. त्यामुळे इंग्रज सरकारने सुभाषबाबुंनी फॉरवर्ड ब्लॉकच्या सर्व मुख्य नेत्यांना कैद केले. दुसरे महायुद्ध सुरू असताना तुरुंगात निष्क्रिय राहणे. सुभाषबाबुंना तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. तेव्हा सरकारने त्यांची सुटका केली. परंतु इंग्रज सरकार युद्ध काळात सुभाषबाबुंना मोकळे ठेवू इच्छित नव्हते. त्यामुळे सरकारने

त्यांना त्यांच्याच घरात नजरकैदेत ठेवले.

## देशाबाहेर प्रयाण - नजरकैदेतून सुटू निसटले.

सुभाषबाबूंना नजरकैदेतील निष्काम जगणे निरर्थक वाटत होते. नजरकैदेतून निसटण्यासाठी त्यांनी एक योजना बनवली 16 जानेवारी 1941 रोजी पठाणी वेशभूषेत महमद झियाउद्दीन असे नाव धारण करून ते पोलिसांची नजर चुकवून घरातून निसटले पठाणाच्या वेशात लपत - छपत खडतर प्रवास करित ते काबुलला पोहचले तेथून ते मास्कोमार्गे बर्लिनला गेले. त्यांनी हिटलरची भेट घेऊन हिंदुस्थानाच्या राजकीय परिस्थितीची माहिती हिटलरला दिली हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याची घोषणा हिटलरने भेट घेऊन हिंदुस्थानाच्या राजकीय परिस्थितीची माहिती हिटलरला दिली. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याची घोषणा हिटलरने करावी यासाठी हिटलरचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश मिळाले नाही त्यानंतर त्यांनी महायुद्धात जर्मनीशी सहकार्य करीत असलेल्या जपानकडे एका जर्मन पाणबुडीतून सुमात्रा येथे गेले व तेथुन ते हवाईमार्गाने टोकिओला पोहचले त्यांनी जपानचे पंतप्रधान टोजो यांची भेट घेतली. टोजो यांनी हिंदुस्थानला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल असे स्पष्ट केले.

## आझाद हिंद सेनेची स्थापना.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात आझाद हिंद सेनेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जगभरात व भारतातही चळवळजनक घटना घडत होत्या. जपानने महायुद्धात आघाडी घेतली 7 डिसेंबर 1941 रोजी अमेरिकेच्या पर्ल हर्बर या नाविक तळावर जोरदार हल्ला करून जपान दुसऱ्या महायुद्धात उतरले होते. इंडोचायना, इंडोनेशिया मलाया व सिंगापूर असे एकामागून एक याप्रमाणे प्रदेश जिंकून दोस्तराष्ट्रांच्या फौजांची दाणादाण उडवली. इंग्लिश, फ्रेंच डच वसाहतीवर कब्जा मिळवून जपान मलायात येऊन पोहचला या

मुख्यत ब्रिटनने शेकडो हिंदी सैनिक युद्धकैदी म्हणून जपानच्या ताब्यात आले होते. जपानने घेतलेल्या प्रदेशात लक्षावधी हिंदी लोक वास्तव्य करून होते त्यांची इंग्रजाविरुद्ध संघटना बांधण्याचे रासबिहारी बोस या प्रसिद्ध क्रांतीकारने ठरवले सन 1915 ला व्हाईसरॉयवरील बॉम्बहल्ल्यात ते प्रमुख आरोपी होते. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या हेतूने त्यांनी पुढल्य गलावेले होते बॉम्ब हल्ला झाल्यानंतर ते जपानला आले होते. युद्धकैदी म्हणून शरण आलेल्यामध्ये कॅ मोहन सिंग नावाचा एक हिंदी अधिकारी जपानमध्ये होता. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी त्याचे मन वळविण्याचे काम रासबिहारी बोस यांनी केले मलाया सिंगापूर ब्रम्हदेश येथे इंग्रजांच्या अनेक हिंदी फौजा जपानला शरण गेल्या होत्या. जपानने जिंकलेल्या प्रदेशात लक्षावधी हिंदी लोक राहत होते. त्यांना संघटित करून रासबिहारी यांनी इंडियन इंडिपेंडन्स लीग जपानमध्ये स्थापना केली होती. त्यातून इंडियन नॅशनल आर्मी हे सेनादल स्थापन केले. हिंदी जनतेत ही सेना आझाद हिंद सेना वा आझाद हिंद फौज या नावाने सर्वत्र परिचित झाली. कमांडर इन चीफपदी कॅ. मोहन सिंगाची नियुक्ती करण्यात आली. पुढे त्यांच्याशी मतभेद झाल्याने त्यांना काढून टाकले त्यामुळे रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे आझाद हिंद सेनेचे नेतृत्व करण्याचे अवाहन केले.

## नेताजी सुभाषचंद्र बोस आझाद हिंद फौजेचे रससेनापती

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे ध्येयाने सुभाषचंद्र भारावून गेले होते. रासबिहारी यांचे निमंत्रण मिळताच मलसागराच्या तळाने यु बोटीतून हजारो मैलांचा प्रवास करून सुभाषचंद्र टोकियोस पोहचले (13 जून 1943) तेथे जपानी पंतप्रधान तोजो यांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले जपानी फौजा व आझाद हिंद फौजा यांच्याकडून संयुक्तपणे भारताची भुमी ज्या प्रमाणात मुक्त केली जाईल त्या प्रमाणात हिंदी लोकांच्या ताब्यात देण्यात येईल असे आश्वासन तोजो यांनी त्यांना दिले. त्यानंतर रासबिहारी यांनी आझाद हिंद सेनेस चलो दिल्ली जी घोषणा दिली लोकांनी मोठ्या प्रमाने त्यांना नेताजी ही पदवी बहाल केली पुढे याच नावाने ते

Scanned by CamScanner

भारताच्या इतिहासात अजरामर झाले.

## १) आझाद हिंद सेनेची कामगिरी / हंगामी सरकारची घोषणा

नेताजींनी आझाद हिंद सेनेच्या पुनर्रचनेचे कार्य हाती घेतले. सेनेत सर्व जातीजमातीचे सैनिक होते. स्त्रियांचीही लष्करी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आली. त्यांनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूरला स्वातंत्र्य भारताचे हंगामी सरकार स्थापन केले ते स्वत: ह्या सरकारचे राष्ट्रपती पंतप्रधान मुख्यमंत्री बनले. हिंदी स्वातंत्र्यासाठी आपण पंतप्रधान मुख्यम. इंग्लंड अमेरिका यांच्या विरोधात लढा पुकारला आहोत. असे त्यांनी जाहीर केले. आझाद हिंद सेनेला हिंदी स्वातंत्र्यासाठी लढा देण्यास स्फूर्ती दिली. या घटनेचे पडसाद जगभर उमटले. जपान, जर्मनी, इटली, ब्रम्हदेश, चीन, मांचुरिया इत्यादी देशांनी नेताजींच्या हंगामी सरकारला मान्यता दिली. सुभाषचंद्रांनी सेनेला दिल्लीवर चाल करून जाण्यासाठी चलो दिल्ली चा आदेश दिला.

## २) ब्रम्हदेशातील इंग्रज फौजांचा पराभव :-

नेताजींनी आझाद हिंद सेनेत राष्ट्राभिमानाची ज्योत पेटवली होती. फौजेत गांधी ब्रिगेड आझाद ब्रिगेड व नेहरू ब्रिगेड अशा तीन ब्रिगेड निर्माण केल्या त्याशिवाय त्यास स्त्रियांच्याखाली कॅप्टन कुमारी लक्ष्मी स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली झाशीची राणी पलटन स्थापन करण्यात आली होती. नेताजींनी आझाद हिंद सेनेस व आशियातील भारतीय जनतेस तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दूंगा। अशी हाक दिली. नेताजींनी निर्माण केलेल्या तीन ब्रिगेडने जपानी फौजाबरोबर राहून ब्रम्हदेशातील इंग्रज फौजांचा मोठा पराभव केला.

## ३) अंदमान निकोबार बेटे व मोवडॉक ठाणे जिंकले :-

आझाद हिंद सेनेने सेनापती जपानी लष्कराबरोबर भारतीय सरहद्दीकडे कूच केले दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान व निकोबार बेटे जिंकली ही बेटे भारताचे हंगामी सरकार (आर्जी हुकूमत ए. आझाद हिंद) च्या अनुशासनाखाली राहिली

नेताजींनी या बेटांचे शहीद आणि स्वराज्य बेटे असे नामकरण केले. १९४४ च्या जानेवारीत आझाद हिंद सेनेने आसामच्या सरहद्दीवरील मोवडॉक हे ठाणे सर केले.

4) आसामधील ठाणी जिंकून फडकवला झेंडा !-

आझाद हिंद सेना शौर्याने लढा देत होती सेना हिंदुस्थानकडे आगेकूच करीत आसामच्या सरहद्दीवर पोहचली आसाममधील मोराई, कोहिमा, मणिपूर, बिष्णुपूर इ. ठाणी जिंकून जपानी फौजेबरोबर त्यांनी फडकवला आझाद हिंद सेनेच्या इतिहासात भारतीय सीमेवरील फडकवला लढा चिरस्मरणीय ठरला आझाद हिंद सेनेची लष्करी शक्ती मर्यादित होती. त्यांच्याकडे पुरेसे युद्ध साहित्य व अन्नधान्याचा साठा नव्हता. त्यामुळे सेनेच्या जवानांना हालअपेष्टा व उपासमार सहन करावी लागे सुद्धा त्यांनी ब्रिटिश फौजेशी पराक्रमाने झुंज दिली ब्रिटिश फौजांचा विजय होऊ लागला. जपानी फौजेचा पराभव झाल्यामुळे त्यांनी शरणागती स्वीकारावी लागली त्यामुळे आझाद हिंद सेनेलाही ब्रिटिश सैन्यापुढे शरण जावे लागले.

5) सिंगापूर रेडिओ स्टेशन व नॅशनल बँक ऑफ आझादची स्थापना

सुभाषबाबूंनी स्थापन केलेल्या हंगामी स्वातंत्र्य हिंदुस्थानाच्या सरकारला त्यांनी जर्मनीची मान्यता घेतली होती. सिंगापूर रेडिओ स्टेशन सुरू करून त्यांनी देशवासीयांना स्वातंत्र्य लढ्यात सामील होऊन दिल्ली स्वारी करण्यासाठी चलो दिल्ली असा रेडिओवरून संदेश दिला होता. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानाचा ध्वज फडकविण्याचा त्यांचा निर्धार होता. त्यांचे हंगामी स्वातंत्र्य हिंदुस्थानचे सरकार जपानच्या हातातील बाहुले नव्हते. ते रीतसर स्थापन झालेले सरकार होते. त्याशिवाय १९४४ मध्ये रंगून या ठिकाणी नॅशनल बँक ऑफ आझाद हिंद ही सरकारी राष्ट्रीय बँक स्थापन केली होती. आझाद हिंद सेनेमध्ये कर्नल जगन्नाथराव भोसले के शहानवाझखान के शहानवाझखान के प्रेम सेहगल के गुरुबक्षसिंग ढिल्लन इ. वरिष्ठ सेनाधिकारी सामील झाले होते,

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

आझाद हिंद सेनेचे महत्व :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात नेताजी व आझाद हिंद फौजा यांची कामगिरी सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे. नेताजींचे भव्य व्यक्तिमत्व मंत्रमुग्ध करणारी त्यांची भाषणे, त्यांशिवाय उदात्त ध्येयासाठी त्याग करणारी प्रेरणा देण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या वाणीमध्ये होते. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी समर्पित भावनेने त्यांनी चालविलेला लढा त्यांचे अलौकिक धैर्य व त्याग यामुळे त्यांच्या शब्दांना नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. जर्मनी व जपानकडून मदत मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला तो केवळ नाईलाज म्हणूनच होता. जर्मन्यांच्या नाही परंतु त्यांनी जपानी फौजांची मदत घेतली होती.

आझाद हिंद फौजेतील सैनिकांनी अतुल पराक्रम करून प्रसंगी प्राणार्पण करून मातृभूमीस स्वातंत्र्य करण्याचा शर्थीचा प्रयत्न केला. दुर्दैवाने ते यशस्वी झाले नाहीत. परंतु देशवासीयांसमोर त्यागाचा नवा आदर्श घालून दिला.

नेताजींनी स्थापन केलेल्या हंगामी स्वातंत्र्य हिंदुस्थानचे सरकार आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले होते. आझाद हिंद फौजेतील विविध जाती धर्मांच्या सैनिकांनी जातिधर्म विसरून देशासाठी एक व्हावे आणि देशासाठी लढा द्यावा हे उदाहरण जनतेसमोर ठेवले. तसेच आझाद हिंद सेनेने परदेशातून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा करावा हि घटना वैशिष्ट्यपूर्ण होती. स्वातंत्र्यलढ्याचा ब्रिटिशांवर मोठा परिणाम झाला. त्यांना आपले राज्य हिंदुस्थानावर फार काळ चालविता येणार नाही. याची धास्ती वाटू लागली. आझाद हिंद सेनेला रणांगणात पराभव पत्करावा लागला असला तरी ब्रिटिश सत्तेचे धैर्य खच्ची करणारा सेनेचा हा नैतिक विजय होता.

ब्रिटिश सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली सेनेवर खटला दाखल केला. त्यामध्ये आझाद हिंद सेनेतील कॅ. शहानवाजखान, गुरुदयालसिंग धिल्लन व प्रेम सेहगल या तीन प्रमुख अधिकाऱ्यांवरही खटला होता. वरिष्ठ अधिकारी सेनेत येण्यापूर्वी ब्रिटिश सैन्यात अधिकारी होते. त्यांनी ब्रिटिश राजाशी एकनिष्ठ राहण्याच्या शपथेचा भंग करून विश्वासघात केल्याचा

Scanned by CamScanner

त्यांच्यावर आरोप होतो. या आरोपींच्या समर्थनार्थ देशभर मोर्चे मिरवणुका निदर्शने सभा मेळावे आयोजित करण्यात आले होते. काँग्रेसने आरोपींच्या बचावासाठी पं. जवाहरलाल नेहरु व तेजबहादुर सप्रू कैलासनाथ काटजू भुलाभाई देसाई यांनी बचाव समिती स्थापन केली. पं. नेहरुंनी 25 वर्षापूर्वी अंगावरुन काढुन टाकलेला वकिलांचा कोट परत अंगावर घातला न्यायालयाने कायद्यानुसार आझाद हिंद सेनेला दोषी ठरवले परंतु ब्रिटिश सरकारला प्रचंड लोकप्रियतेच्या व जनमत प्रक्षुब्ध झाल्यामुळे शिक्षा रद्द करुन सर्व आरोपींना सोडुन द्यावे लागले.

स्वातंत्र्यवीर सावरकर आझाद हिंद फौज व नेताजींविषयी म्हणतात. सन 1857 पासून क्रांतीकारकांना सैन्यात राजकारण नेऊन पोहोचविण्याचा जो उद्देश होता. तो सफल झाला व 15 आगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य देणे ब्रिटिश सरकारला भाग पडले याचे बरेचसे श्रेय 1857 पासुन सशक्त क्रांतीकारकांनी सुरु केलेल्या व नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी लढविलेल्या स्वातंत्र्य युद्धालाच आहे.

थोडक्यात 150 वर्षे भारतावर जुलुमाने राज्य करणाऱ्या ब्रिटिश सत्तेला उखडुन लावण्याचे व देश स्वातंत्र्य करण्याचे श्रेय नेताजींनी आझाद हिंद सेना उभारुन व सशक्त लढा करुन पेटविलेल्या स्वातंत्र्यसंग्रामालाच आहे व खऱ्या अर्थाने ते भारताचे विजयशाली स्वातंत्र्यसमर ठरते.

## • नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा मृत्यु

दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील नेताजींनी नवा पर्याय शोधण्यासाठी प्रयत्न चालु केले. रशियाकडुन मदत मागवयाचे त्यांनी ठरविले होते. आझाद हिंद सेनेने शरणागती स्वीकारल्यानंतर सुभाषबाबु सिंगापुरहुन टोकिओला विमानातुन येत असताना विमानाला 18 आगस्ट 1945 रोजी अपघात होऊन त्यात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या मृत्युवरी चौकशी करण्यासाठी अनेक वेळा चौकशी समित्या नियुक्त केल्या. परंतु कोणत्याही समितीला नेताजींच्या मृत्युबद्दलचे अंतिम सत्य उजेडात आणता आले नाही. थोडक्यात नेताजी कुठे व कसे बेपत्ता झाले त्याचे पुढे नक्की काय झाले हे भारताच्या इतिहासातील सर्वात मोठे अनुत्तरित रहस्य बनले आहे. नेताजींच्या जाण्याने भारत एक महान सुपुत्राला मुकला गेला.

Scanned by CamScanner